**नियमित दिवाणी दावा क्र. १८८/२०२४**
**(जगन्नाथ कोरे वि. शिवाजी निकम)**
**निशाणी ५ खालील आदेश**

१. प्रस्तूतचा अर्ज वादी यांचेतर्फे प्रतिवादी यांचेविरुध्द दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम १, २ आणि १५१ अन्वये तूर्तातूर्त ताकिदीसाठी दाखल केला आहे.

**वादीचे अर्जातील हकीकत थोडक्यात खालीलप्रमाणे–**

२. मौजे चिंचणी–मंगरुळ, ता.खानापूर, जि.सांगली येथील गट क्र.५८४ याचे एकूण लागवडी योग्य क्षेत्र हे. ५–५९ आर, पो.ख. हे.१–०७ आर, असे एकूण हे.६–६६ आर, याचा आकार रु.१–७५ पैसे ची शेत मिळकतीचे चतु:सिमा खालीलप्रमाणे–

पूर्वेस – गट क्र.५८५ ची मिळकत.
पश्चिमेस– गट क्र.५८५, ५८२ त्यापलीकडे गट क्र.५८३ ची मिळकत.
दक्षिणेस– गट क्र.५८३, ५८२, ५९१ ची मिळकत.
उत्तरेस– गट क्र.५८५ ची मिळकत.

येणेप्रमाणे चतु:सिमापूर्वक शेत मिळकत, त्यामधून जाणारे चिंचणी–कारवे जाणारा सरकारी रस्ता तसेच तदंगभूत वस्तूसह व इजमेंटरीचे सर्व हक्कासह मिळकत.
(सदर मिळकतीस सोईकरीता 'वाद मिळकत' असे संबोधण्यात येते)

३. वाद मिळकत ही वादी आणि अरुणा अरुण मिठारे, छाया मोहन महाजन, निर्मला निळकंठ लकडे, शिवलिंग पांडुरंग कोरे आणि श्रीमती भानुदास कोरे यांचे समाईक मालकी हक्काची व कब्जे वहिवाटीची आहे. सदरची मिळकत वादी वगैरे सहहिश्येदारांना वारसाने प्राप्त झालेली मिळकत आहे व ती सर्वजण समाईकात कब्जेवहीवाटत आहेत. यातील वादी व अन्य सहहिश्येदार हे सदरील मिळकत त्यांचे मर्जीनुरुप उपभोगत आहेत. असे असताना, यातील प्रतिवादी यांनी मे. तहसिलदारसाो, खानापूर–विटा यांचे कोर्टात

त्यांच्या मालकीच्या शेतजमिन गट नं.५८२/२ या गटामध्ये जाणेयेणेसाठी वादी यांच्या मालकीच्या गट नं. ५८४ या मिळकती मधुन खोटे पणाने रस्ता असल्याचा व तो धमकी देऊन बंद केल्याचे खोटे कथन करुन मे. तहसिलदार सो. खानापुर–विटा यांचे न्यायालयात क्र. रस्ता केस नं. ०४/२२ चे प्रकरण दाखल केले होते. सदर प्रकरणात वादी हजर होऊन त्यांनी रितसर म्हणणे दाखल केलेले होते. वस्तुतः प्रतिवादी यांच्या मालकीच्या गट नं. ५८२/२ यामध्ये जाण्यासाठी वादींच्या मालकीच्या गट नं. ५८४ मधुन केव्हाही व कधीही पुर्वापार गाडी रस्ता अथवा कोणताही रस्ता नव्हता व नाही, तशा रस्त्याबाबतची कोणत्याही शासकीय दरबारी नोंद नव्हती व नाही, त्यामुळे सदर ठिकाणी रस्ता केव्हा व कधीही अस्तित्वात नसल्याने यातील प्रतिवादी वा त्यांचे पुर्व हक्कदार यांनी तथाकथित रस्ता वापरण्याचा प्रश्नच उद्भवत नव्हता व नाही.

४. तथाकथित रस्ता शासकीय नकाशावर अथवा मिळकतीच्या ७/१२ पत्रिकेत नोंद नसताना मे. तहसिलदार सो. खानापुर यांनी त्याबाबत पुर्ण कायदेशीर अशी चौकशी न करता एकतर्फी घाईगडबडीने निर्णय दिला आहे. सदर मिळकतीमध्ये प्रतिवादी यांना स्वतःचाच रस्ता असल्याने त्यांना अन्य कोणाच्या मिळकतीमधुन जाण्यायेण्यासाठी केव्हाही व कधीही रस्त्याची आवश्यकता नव्हती व नाही. त्याप्रमाणे प्रतिवादींच्या मालकीच्या गट नं ५८२/२ या मिळकती लगत चिंचणी कारवे डांबरी रस्ता जात असुन प्रतिवादी व त्यांचे कुटुंबिय त्यांच्या मिळकतीमध्ये जाण्यायेण्यासाठी स्वतःच्याच मिळकती मधुन वहीवाट करत आहेत. आजमितिस ही प्रतिवादी हे गट नं.५८२/२ मधुन असणाऱ्या डांबरी रस्त्यास त्याच गटात जा–ये करीत आलेले आहेत. ?

५. दावेचा अंतिम न्यायनिर्णय होणेस बराच कालावधी लागणार आहे. यादरम्यानच्या काळात प्रतिवादी हे दावा मिळकतीमधून मे. तहसिलदारसो, खानापूर–विटा यांचेकडील क्र.रस्ता केस नं. ०४/२०२२ कामीच्या दिनांक २४/०५/२०२४ रोजीच्या आदेशाचे आधारे दावा मिळकतीमध्ये नव्याने रस्ता करणेच्या प्रयत्नात आहेत.

तशा प्रतिवादी यांच्या हालचाली सुरु झालेने वादीने तातडीने प्रस्तुतचा दावा दाखल करुन मे.तहसिलदारसाो यांचे उक्त निर्णयाचे अंमलबजावणीस स्थगिती देणे बाबत व दावा मिळकतीमधील वादीचे शांततामय कब्जेवहिवाटीस कोणत्याही प्रकारे अडथळा करु नये अशी प्रतिवादी यांना तात्पुरती ताकीद प्रतिवादींना देणे साठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

<u>प्रतिवादी तर्फे नि.क्र.३० वर वादीचे तूर्तातूर्त ताकीद अर्जास म्हणणे थोडक्यात खालीलप्रमाणे</u>–

६. वादीचा तूर्तातूर्त ताकीद अर्जातील संपूर्ण मजकूर साफ खोटा व लबाडीचा असून तो या प्रतिवादीस मान्य नाही. सदयस्थितीत सदरील प्रतिवादी यांनी जादा कोणताही रस्ता केलेला नव्हता व नाही. वास्तविक पाहता मा. तहसिलदारसो, खानापूर–विटा यांनी दिलेल्या आदेशानुसार दि.२४.०८.२०२४ रोजी प्रतिवादी यांनी रस्ता खुला केला होता तोच रस्ता वादी, प्रतिवादी व लगतचे हिस्सेदार यांचे वापरात आहे. प्रतिवादी यांनी गट क्र.५८२/२ या मिळकतीमध्ये जाणेयेणेकरीता गाडी रस्ता पूर्वपारपासून आहे. सदरचा रस्ता गट क्र.५८४ मध्ये वादी यांनी अडविलेबाबत मामलेदार कोर्ट अॅक्ट १९०६ चे कलम ५(२) अन्वये आडविलेला रस्ता खुला करुन मागितलेला होता व सदरील कामामध्ये मा.तहसिलदार खानापूर–विटा यांनी वादी, प्रतिवादी यांना नोटीसा काढून त्यांचेकडून म्हणणे मागविले होते. त्यामध्ये दि.२३.०६.२०२२ रोजी स्थळपाहणी करुन स्थळ निरीक्षण टिप्पणी/स्थळ पंचनामा केलेला होता व आहे.

७. स्थळ पंचनाम्यामध्ये सदर गटामध्ये रस्ता होता व आहे व सदर रस्ता हा गट क्र.५८४ मध्ये चर मारुन अडविलेला होता हे शाबीत झालेले होते. त्यानुसार सदर रस्ता खुला करुन देणेचा आदेश दि.२४.०५.२०२४ रोजी तहसिलदार यांनी दिलेला आहे. तसेच या स्थळपाहणीमध्ये वादी यांना उपरोक्त नमूद वहिवाट रस्त्याव्यतिरीक्त इतर

पर्यायी रस्ता मोक्यावर दिसून आला नाही. अशाप्रकारे स्थळपाहणीमध्ये टिप्पणी नोंदविलेली आहे. त्यामुळे दुसरा पर्यायी रस्ता आहे हे वादी यांचे कथन धादांत खोटे आहे. तहसिलदार, खानापूर–विटा यांनी चालवलेली प्रोसिडींग ही कायदयातील तरतुदीस अनुसरुन चालवलेली असलेने त्यास कायदयातील कोणत्याही तरतुदीची बाधा येत नाही. तसेच गट क्र.५८४ मध्ये वादी यांची जमीन असून वादी यांची वहिवाट रस्त्याचे बाजूस आहे व इतर सहहिस्सेदारांनी कोणत्याही प्रकारची तक्रार, हरकत आजअखेर केलेली नव्हती व नाही. त्यामुळे वादी यांचा दावा व त्यासोबतचा ताकीद अर्ज खर्चासह रद्द करणेत यावा.

८. वादी यांच्या विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला, दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले. प्रस्तुत अर्ज हा तुर्तातुर्त मनाईकरीता दाखल केला असल्याने दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम १ व २ अन्वये खालील मुद्दे व त्यावरील कारणमिमांसे सहीत निष्कर्ष खालील प्रमाणेः–

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | प्रथमदर्शनी केस अर्जदार यांच्या बाजुने आहे काय ? | **नाही.** |
| २. | न्यायाचा समतोल अर्जदाराच्या बाजुने आहे काय ? | **नाही.** |
| ३. | अर्जदारांनी मागणी केल्याप्रमाणे तुर्तातुर्त मनाई आदेश न दिल्यास अर्जदारांचे कधीही न भरुन येणार नुकसान होणार आहे काय ? | **नाही.** |
| ४. | अंतिम आदेश काय ? | **अर्ज नामंजूर करण्यात येत आहे.** |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्रमांक १ ते ३ करीता** –

९. प्रथमदर्शनी केस ही वादी यांच्या बाजुने असल्याचे सिध्द करण्याकरीता

वादी यांनी तहसिलदार यांचा रस्ता केस ०५/०४/२००२ च्या निकालाची प्रत तसेच स्थळ निरीक्षण टिपणी दाखल केली आहे. वादी यांच्या कथनानुसार मौजे चिंचणी (मंगरुळ), ता.खानापूर, जि.सांगली हद्दीतील गट क्र.५८४ (दावा मिळकत) ही वादी तसेच अरुणा मिठारे, छाया महाजन, निर्मला लकडे, शिवलिंग कोरे व श्रीमंती कोळी यांची सामाईक मालकीहक्काची कब्जेवहिवाटीची मिळकत आहे. प्रतिवादी व त्यांचे कुटूंबीयांचे मंगरुळ येथील गट क्र.५८२/२ व गट क्र.५८२/४ अशा मिळकती आहेत. सदर मिळकतींबाबत प्रतिवादी व त्यांच्या कुटूंबीयांमध्ये वाटपपत्र होवून प्रत्येकाच्या हिश्यास वहिवाट देण्यात आली होती. परंतू प्रतिवादी हे दांडगाव्याने वादीच्या मिळकतीमधून रस्ता करुन वादीच्या वहिवाटीस अडीअडथळा निर्माण करीत आहेत.

१०. वादीच्या म्हणण्यानुसार प्रतिवादी यांनी तहसिलदार यांच्याकडे दाखल केलेला रस्ता केसमध्ये गट क्र.५८२/२ मध्ये जाण्यासाठी वादींच्या मालकीच्या गट क्र.५८४ मधील रस्त्याची मागणी केली आहे. परंतू प्रतिवादी यांना कधीही पुर्वापार गाडी रस्ता अथवा कोणताही शासकीय मंजूर रस्ता वादीच्या मिळकतीतून उपलब्ध नव्हता व नाही. तहसिलदार यांनी गट क्र.५८४ मधील सर्व हिस्सेदारांना पक्षकार न करता तसेच प्रकरणाची सुनावणी चुकीच्या स्थळनिरीक्षण टिपणी आधारे निर्णय दिला. सदर चुकीच्या निर्णयाच्या आधारे प्रतिवादी हे वादीच्या शांततामय कब्जास अडीअडथळा करीत आहेत.

११. उलटतपक्षी प्रतिवादी यांच्या कथनानुसार प्रतिवादी तसेच इतर सहहिस्सेदार गट क्र.५५४ मधील रस्ता हा सुमारे ५० ते ६० वर्षांपासून वापर करीत आहेत. तहसिलदार यांचे समोर चाललेल्या प्रकरणामध्ये वादींनी हजर होवून त्यांचा आक्षेप मांडला होता. वादींनी सदर निर्णयावर मुदतीत कोणतेही अपिल केले नाही. केवळ प्रतिवादी यांना न्यायाने मिळालेली दाद उपभोगता येवू नये व नाहक त्रास देणेकरीता प्रस्तुतचा दावा दाखल केला आहे.

१२. वादी यांनी कथन केल्याप्रमाणे तहसिलदार यांच्या समोरील रस्ता केसमध्ये हजर होवून त्यांनी रितसर म्हणणे दाखल केले होते. तसेच वादी यांनी दाखल केलेल्या स्थळ निरीक्षण टिपणी चे अवलोकन केले असता, त्यावर वादी क्र.१ व २ यांची स्वाक्षरी असल्याचे दिसून येते. त्यामुळे तहसिलदार यांचे समोर चाललेले प्रकरण हे वादी यांच्या उपस्थितीत तसेच वादींचे कथन व पुरावे विचारात घेवून न्यायनिर्णय दिल्याचे निदर्शनास येते. वादी हे कथन करतात त्याप्रमाणे गट क्र.५८४ मधील सर्व सहहिस्सेदारांना पक्षकार न केल्याने तहसिलदार यांचा निर्णय हा कायद्यास अनुसरुन नसल्याचे मांडण्यात आले आहे. परंतू सदर गटातील इतर सहहिस्सेदार यांनी सदर प्रकरणात हजर होवून अथवा तहसिलदार यांच्या समोरील रस्ता केसमध्ये हजर होवून त्याबाबत कोणताही आक्षेप घेतल्याचे निदर्शनास येत नाही. वादी हे रस्ता केसमध्ये पक्षकार असून त्यांनी रितसर त्यामध्ये त्यांचे म्हणणे दिले होते. त्यामुळे वादी यांना सदर प्रकरणात त्याबाबत आक्षेप घेता येणार नाही.

१३. दाव्यामध्ये वादी यांनी तहसिलदार खानापूर विटा यांच्याकडील रस्ता केस क्र.४/२०२२ चे कामी दिनांक २४.०५.२०२४ रोजीचा निर्णय हा रद्दबातल व बेकायदेशीर असल्याचे जाहीर होवून मिळणेबाबत मागणी केली आहे. सदरचा तहसिलदार यांचा निर्णय हा कायदेशीर अथवा बेकायदेशीर आहे किंवा कसे याबाबतचा निर्णय सबळ पुराव्यानिशी विचारात घेणे आवश्यक आहे. वादी यांनी प्रस्तुत अर्जात सदरचा निर्णय होईपर्यंत, तहसिलदार यांच्या निकालाआधारे प्रतिवादी यांनी दावा मिळकतीमधील वादीच्या शांततामय कब्जेवहिवाटीस अडीअडथळा करु नये अशी तात्पुरती मनाई हुकूम मिळणेबाबत मागणी केली आहे. परंतू सद्यस्थितीत तहसिलदार यांच्या निर्णयाबाबत कोणताही निष्कर्ष काढलेला नसल्याने, वादी मागणी करतात त्याप्रमाणे प्रतिवादी यांचे विरुध्द मनाई हुकूम दिल्यास वादींना अंतिरिम स्वरुपात अंतिम मागणी मंजूर केल्याप्रमाणे होणार आहे. तसेच वादी यांनी तहसिलदार यांच्या निर्णयाविरुध्द मुदतीत कोणतेही अपिल केले नाही. तसेच अपिल न करणेबाबत कोणतेही संयुक्तीक कारण दाखल केलेले

नाही. त्यामुळे प्रथम दर्शनी केस ही वादींच्या बाजुने असल्याचे निदर्शनास येत नाही. त्यामुळे मुद्दा क्र.१ चे उत्तर मी **नकारार्थी** नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्र.२ करीता –</u>**

**१४.** वादी यांच्या कथनानुसार प्रतिवादी हे तहसिलदार यांनी दिलेल्या बेकायदेशीर निर्णयाआधारे वादी यांच्या कब्जेवहिवाटीस अडथळा निर्माण करीत आहेत. प्रतिवादी यांच्या म्हणण्यानुसार तसेच तहसिलदार यांचा रस्ता केस ५/०४/२२ चा निर्णय पाहता वादी यांच्या गट क्र.५८४ मधील दक्षिण–उत्तर चालीचा १० फुट रुंदीचा रस्ता प्रतिवादी यांना वहिवाटीस वापर करणेबाबत मंजूर करणेत आला आहे. यावरुन असे निदर्शनास येते की, प्रतिवादी यांचा गट क्र.५८४ मधील केवळ १० फुट रुंदीच्या रस्त्यापुरता वापर मर्यादीत आहे. त्यामुळे वादीच्या उर्वरित क्षेत्रात प्रतिवादी यांचा प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरित्या हस्तक्षेप आहे असा कोणताही आक्षेप वादींनी घेतला नाही.

**१५.** प्रतिवादी यांना सदर रस्त्याचा वापर दावा निकाल होईपर्यंत नाकारल्यास प्रतिवादी यांना होणारे नुकसान हे, सदर अर्ज नामंजूर झाल्यास वादी यांना होणाऱ्या नुकसानाच्या तुलनेत जास्त आहे. त्यामुळे न्यायाचा समतोल हा प्रतिवादी यांच्या बाजुने असल्याचे प्रथम दर्शनी निदर्शनास येते. त्यामुळे मुद्दा क्र.२ ची कारणमिमांसा **नकारार्थी** नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्र.३ करीता –</u>**

**१६.** वादी यांच्या कथनानुसार प्रतिवादी यांना गट क्र.५८२/२ मध्ये जाण्याकरीता पर्यायी मार्ग असताना देखील प्रतिवादीने दांडगाव्याने वादीच्या दावा मिळकतीमधून तहसिलदार यांच्या बेकायदेशीर निर्णया आधारे रस्ता निर्माण करीत आहेत. तसेच त्याकरीता प्रतिवादी हे वादीच्या शांततामय वहिवाटीस अडथळा निर्माण

करीत आहे. उलटपक्षी प्रतिवादी यांचे म्हणणे आहे की, प्रतिवादी हे सदर रस्त्याचा वापर मागील ५० ते ६० वर्षांपूसन वहिवाटीकरीता वापर करीत असून तहसिलदार यांनी वादी व प्रतिवादी यांची कथने तसेच स्थळपाहणी व पुराव्यानिशी निर्णय देवून प्रतिवादी यांना वादींच्या मिळकतीतून रस्ता मंजूर केला आहे.

१७. मुद्दा क्र.१ मध्ये उल्लेख केल्याप्रमाणे वादी यांना तहसिलदार यांच्या निर्णयावर उपविभागीय अधिकारी विटा यांचेकडे आक्षेप घेणेकरीता निकाल दिनांका पासून ६० दिवसांचा अवधी होता. तहसिलदार यांचा निकाल दिनांक २४.०५.२०२४ रोजी देण्यात आला असून वादी यांनी प्रस्तुतचा दावा २६.०७.२०२४ मध्ये दाखल केला आहे. यावरुन प्रथमदर्शनी असे निदर्शनास येते की, वादी यांना सदर निर्णयाविरुध्द योग्य ती दाद मिळण्यास पुरेशी संधी उपलब्ध असताना त्यांनी त्याबाबत कोणतीही दाद मागितली नाही. सदर न्यायालयास प्रस्तुतचा दावा चालविणेचा अधिकार असला तरी वादी यांनी तहसिलदार यांच्या निर्णयावर मुदतीत रिव्हीजन का दाखल केले नाही याबाबतचा कोणताही खुलासा दिलेला नाही. तसेच वादींसमक्ष झालेल्या स्थळ पाहणी बाबात वादींनी तहसिलदार यांचे समोरील प्रकरणात देखील कोणताही आक्षेप घेतलेबाबत पुरावा दाखल करणेत आलेला नाही. वादी यांना अंतरिम मनाई अर्ज मंजूर होण्यास पात्र असणेकरीता न्यायालयासमोर वादी हे स्वच्छ हाताने आले असल्याचे सिध्द करणे आवश्यक आहे.

१८. प्रस्तुत अर्ज मंजूर झालेस दावा निकाल लागेपर्यंत प्रतिवादी यांना तहसिलदार यांनी मंजूर केलेल्या रस्त्याचा वापर करता येणार नाही. दावा मिळकत व प्रतिवादी यांच्या मिळकतीत शेतजमीनी आहेत. दावा अंतिम निकाली लागेपर्यंत प्रतिवादी यांच्या विरुध्द मनाई हुकूम दिल्यास प्रतिवादी यांना त्यांची शेतमिळकत योग्यरित्या कसता येणार नाही. याउलट वादी यांच्या दावा मिळकतीतील केवळ १० फुट रुंदीच्या रस्त्याबाबत वाद अस्तित्वात आहे. वादी हे सदर गटातील उर्वरित क्षेत्र शांततामय

पध्दतीत वहिवाट व उपभोगू शकतात. त्यामुळे सदरचा अर्ज मंजूर झाल्यास प्रतिवादी यांचे कशानेही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. सबब मी मुद्दा क्र.३ चे उत्तर **नकारार्थी** नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्र.४ करीता –</u>**

**१९.** प्रस्तुत अर्जात वादी यांनी गट क्र.५८४ मध्ये व तेथुन पुढे प्रतिवादीच्या गट क्र.५८२/२ मध्ये जाणेयेणेकरीता निर्माण केलेल्या रस्त्याचा येणेजाणेकरीता वापर करु नये अशी तुर्तातुर्त ताकदी तसेच दावा मिळकत पुर्ववत करणेबाबत आदेश होण्याची मागणी केली आहे. परंतू मुद्दा क्र. १ ते ३ ची कारणमिमांसा नोंद करतेवेळी मी या निष्कर्षावर आले आहे की, वादी यांनी प्रथमदर्शनी केस त्यांच्या बाजुने असल्याचे तसेच न्यायाचा समातोल त्यांच्या बाजुने असल्याचा व तुर्तातुर्त मनाई हुकूम न दिल्यास त्यांना न भरुन येणारे नुकसान होईल याबाबी प्रथम दर्शनी सिध्द केल्या नाहीत. त्यामुळे वादीच्या दावा मिळकतीमधील कब्जेवहिवाटीस अडीअडथळा व हरकत करु नये, अशी प्रतिवादी यांचे विरुध्द तुर्तातुर्त ताकीद देण्यात येत नाही. तरी वरील सर्व बाबींचा विचार करता मी खालील आदेश पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

| | |
|---|---|
| १. | वादी यांचा निशाणी ५ वरील अर्ज नामंजूर करणेत येतो. |
| २. | खर्चाबाबत कोणताही आदेश नाही. |

PALLAVI MANSING SURYAWANSHI

Digitally signed by PALLAVI MANSING SURYAWANSHI
Date: 2026.03.25 14:46:22 +0530

दिनांक : २५/०३/२०२६
ठिकाण – विटा.

**[श्रीमती पल्लवी मा. सुर्यवंशी]**
दुसरे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर विटा,
ता.खानापूर, जि.सांगली